CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २२ सप्टेंबर २०२२ | वर्ष : २० वे | अंक : ३५३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८



## कॉमेडीयन राजू श्रीवास्तवने घेतला जगाचा निरोप

**मुंबई :** कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचं निधन झालं आहे. वयाच्या ५९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती बिघडली होती. १० ऑगस्ट रोजी सकाळी व्यायाम करत असताना ते ट्रेड मिलवर कोसळले. यावेळी त्यांना तत्काळ एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. एम्स रुग्णालयातील आयसीयू डिपार्टमेंटमधील व्हेंटिलेटवर ठेवण्यात आलं होतं. त्यांच्यावर अँजिओप्लास्टी ही शस्त्रक्रिया पार पडली होती. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या विनोदी शैलीनं प्रेक्षकांची मनं जिंकली होती. आता त्यांच्या निधनानं मनोरंजनसृष्टीमध्ये शोककळा पसरली आहे. १९८९ मध्ये रिलीज झालेल्या मैने प्यार किया या चित्रपटात त्यांनी काम केलं. राजू श्रीवास्तव हे त्यांच्या विनोदी शैलीनं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकत होते.

# डीसीसीची सभा वादळी ठरली, 'आर्यन'वर अखेर गदा फिरली

- टास्क फोर्स नेमून संचालकांच्या प्रॉपर्टीवर बोजा चढवण्याचा ठराव
- शैलेश कोतमिरे यांना अभय, बँकेची वर्षभर निवडणूक न घेण्याचा निर्णय

सुराज्य/सोलापूर

सोलापूर डीसीसी बँकेची सर्वसाधारण सभा अखेर वादळी ठरली. बार्शी तालुक्यातील आर्यन शुगर साखर कारखान्याकडे असलेल्या थकबाकीचा मुद्दा अजेंड्यावर होता. त्यावरून ही सभा गाजणार अशी जी शक्यता वर्तवली गेली होती, ती अखेर खरी ठरली. आर्यन शुगरकडे अजूनही ३४० कोटींची थकबाकी आहे. ती वसूल करण्यासाठी टास्क फोर्सची स्थापना करून सर्व संचालकांच्या खाजगी प्रॉपर्टीवर बोजा चढवावा, असा ठराव या सभेत पारित झाल्यामुळे जिल्ह्याच्या साखर कारखानदारीत एकच खळबळ उडाली आहे. बँकेवर प्रशासक नेमल्यापासून कारभारात पारदर्शकता आली आहे. खर्चात काटकसर करून पै ना पै वाचवला जात आहे. ठेवीदारांमध्ये पुन्हा विश्वास निर्माण करून ठेवी वाढवण्यात प्रशासकांनी मोलाचे योगदान दिले. त्याबद्दल या सभेत त्यांची प्रशंसाही करण्यात आली. विशेष म्हणजे प्रशासक असणारे शैलेश कोतमिरे यांनाही अभय दिले गेले. त्यांना एक वर्षाची मुदतवाढ द्यावी तसेच बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक वर्षभर घेऊ नये, असे निर्णय देखील या सभेत घेण्यात आले.

डीसीसी बँकेची १०४ वी सर्वसाधारण सभा बुधवारी, २१ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता प्रशासक शैलेश कोतमीरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सर्वसाधारण सभेत बार्शीचे नेते माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या आर्यन शुगरची जोरदार चर्चा झाली. आर्यन शुगरकडे अजूनही ३४० कोटींची थकबाकी आहे. ती वसूल करण्यासाठी टास्कफोर्सची स्थापना करून सर्व संचालकांच्या खाजगी प्रॉपर्टीवर बोजा चढवावा. प्रशासक शैलेश कोतमीरे यांची बदली न करता त्यांना एक वर्ष मुदतवाढ देऊन जिल्हा बँकेची निवडणूक एक वर्ष घेऊ नये, असेही ठराव करण्यात आले. बँकेने विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून अल्पमुदत, मध्यम मुदत व दीर्घ मुदत कर्ज थकबाकीदारांसाठी प्रस्तावित केलेल्या एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेची माहिती दिली. तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांची गरज विचारात घेत ३ लाखापर्यंत मध्यम मुदत कर्ज योजना नजीकच्या बँकेत येत्या काळात राबविणार असल्याचे प्रशासकांनी यावेळी सांगितले.

दोन वर्षे कोरोनात गेल्यानंतर प्रथमच डीसीसी बँकेची सर्वसाधारण सभा बुधवारी झाली. प्रशासकांच्या कालावधीत बँकेच्या कारभारात सुधारणा झाली. तोटा व एन. पी. ए. कमी झाला. ठेवी वाढल्या हे महत्त्वाचे बदल प्रशासकांच्या कालावधीत झाले. मात्र बिगरशेती व शेती कर्जाची थकबाकी तशीच आहे, याबाबत लवकरच धोरण ठरवणार असल्याचे कोतमिरे यांनी सांगितले. बँकेचे व्यवस्थापक आर. एन. जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर सभेस सहकारी संस्थांचे प्रतिनिधी व सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच बँकेचे अधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.




### बदलीवर पूर्णविराम



आठ दिवसांपूर्वी प्रशासक कोतमिरे यांनी स्वतःहून प्रशासकपद सोडण्याची इच्छा व्यक्त केली होती. यावर डीसीसी बँकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पुणे येथे जाऊन सहकार आयुक्तांकडे त्यांची बदली न करण्याची मागणी केली होती. यावर सहकार आयुक्त काय भूमिका घेणार आहेत ? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते. तर प्रशासक शैलेश कोतमीरे यांचे प्रशासकपद गेल्यास निवडणुका होतील, अशी चर्चा रंगली होती. त्यामुळे या सर्वसाधारण सभेत काय होणार ? कोणकोणते ठराव होणार ? याकडे लक्ष होते. मात्र प्रशासक कोतमिरे यांना वर्षभराचा कालावधी वाढवून मिळत असल्याचा ठराव पास केला आहे. त्यामुळे कोतमिरे यांच्या बदलीस पूर्णविराम मिळाला आहे.

## घरात झोपलेल्या मजुराचा गळा चिरून खून

विडी घरकुल येथील पहाटेची घटना

**झटापट करीत आरोपी अंधाराच्या दिशेने पसार**

**सोलापूर :** घरात झोपलेल्या एका ३६ वर्षीय मजुराचा तीक्ष्ण शस्त्राने गळ्यावर वार करून अनोळखी इसमाने खून केला. खुनी आरोपीला पकडण्यासाठी आलेल्या मयताच्या पत्नी बरोबर झटापट करीत आरोपी पसार झाला. ही घटना जुना विडी घरकुल परिसरातील गंगाई केकडे नगरात आज बुधवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास घडली.

दशरथ नागनाथ नारायणकर (वय ३६ रा. गंगाई केकडे नगर, राज मेमोरियल शाळेजवळ) असे मयताचे नाव आहे. मयत दशरथ नारायणकर हे आपली पत्नी अरुणा आणि १२ वर्षाच्या मुलीसोबत राहण्यास असून ते मजुरीचे काम करत होते. काल रात्री ते घराबाहेर जेवण करण्यासाठी गेले होते. रात्री एक वाजेच्या सुमारास ते घरी परतले असता त्यांची पत्नी अरुणा यांनी त्यांना किचनचा दरवाजा बंद करून झोपण्यास सांगितले होते. पहाटे ३ वाजेच्या सुमारास किचन मधील शिलाई मशीनचा धडधड असा आवाज आल्याने त्या जागी होऊन किचनमध्ये आल्या. त्या ठिकाणी त्यांचे पती



रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्या घाबरून आरडा ओरड केली. त्यावेळी एक अनोळखी इसम मागील दरवाजाजवळ हातात दोरी घेऊन बसलेला आढळला. अरुणा नारायणकर यांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. आरोपीच्या हातातील लोखंडी कडे पकडून त्यांनी आरडाओरड केली. त्यांच्या आवाजाने वरच्या मजल्यावर राहणारे त्यांचे मामा(रखमाजी कोकणे) हे खाली येऊन आतून बंद असलेल दरवाजा वाजवू लागले.तेव्हा आरोपीने अरुणा यांच्या हाताला चावा घेण्याचा प्रयत्न करीत हात सोडवून मागच्या दरवाजातून पसार झाला. कोकणे यांनी त्या इसमाचा पाठलाग केला. मात्र तो अंधाराच्या दिशेने गायब झाला. हा प्रकार घडल्यानंतर कोकणे यांनी याची माहिती पोलिसांना कळविली.

या घटनेची फिर्याद मयताची पत्नी अरुणा नारायणकर (वय २९) यांनी एमआयडीसी पोलिसात दाखल केली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी ३० ते ३५ वयोगटातील, अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट आणि त्याच रंगाची पॅन्ट नेसलेल्या अनोळखी इसमाविरुद्ध विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक राजन माने करीत आहेत.

## पुन्हा सीना-भोगावती जोडकालव्यासाठी सर्वेक्षण

**शासन स्तरावर प्रकल्प मंजुरीसाठी जोरदार प्रयत्न; आ.राजेंद्र राऊतांकडून पाठपुरावा**

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

बार्शी, माढा, मोहोळ आणि उत्तर सोलापूर अशा चार तालुक्यातील गावांसाठी वरदायिनी ठरू पाहणाऱ्या बहुचर्चित सीना - भोगावती जोड कालव्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पुन्हा सर्वेक्षण करण्याचे आदेश निघाले आहेत.

दरम्यान या प्रकल्पांतर्गत भोगावती नदीत दोन ठिकाणांपैकी कोठून पाणी आणून सोडता येईल, याची पडताळणी करण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या मंजुरीसाठी बार्शीचे भाजप आमदार राजेंद्र राऊत यांचा शासन स्तरावर पाठपुरावा सुरू आहे. बार्शी तालुक्यातील सिंचन क्षेत्रामध्ये वाढ करण्याकरिता सतत प्रयत्नशील असणारे आमदार राजेंद्र राऊत यांनी मागील महिन्यात बार्शी तालुक्यातील १५ गावांसह चार तालुक्यातील सिंचनासाठी महत्त्वकांक्षी असलेला सीना भोगावती जोड कालव्याच्या प्रकल्पाचा नवीन सर्वे करण्यासाठी संबंधित अधिकारी व शेतकरी बांधवांसोबत इर्ले या गावी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत त्यांनी अधिकारी व शेतकऱ्यांची मते जाणून घेतली. अनेक वर्षांपासून रखडलेल्या सीना-भोगावती जोड कालव्याबाबत आपण मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत लवकरच बैठक लावणार असल्याची माहिती या बैठकीत त्यांनी दिली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात आमदार राजेंद्र राऊत, जलसंपदा विभागाचे सचिव वी. वी. राजपूत व जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता एच. टी. धुमाळ यांच्यासोबत बैठक झाली. बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना व इतर चार तालुक्यांना या योजनेचा कसा लाभ होईल याबाबत माहिती देण्यात आली होती.

यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडून, या योजनेच्या फेर सर्वे क्षण संदर्भात आदेश काढण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. यानुसार, या योजनेचा सर्वे करण्यास महाराष्ट्र शासनाचे जलसंपदा विभागाच्या उपसचिव जया पोतदार यांनी कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना पत्राद्वारे कळविले असून लवकरच सीना भोगावती जोड कालवा होण्याबाबत, सीना नदीवरून भोगावती नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे पुनर्भरण प्रकल्पाचे लाभ क्षेत्र सर्वेक्षणा बाबत आदेश जारी करण्यात आले आहेत.

### ... अन्यथा तुमच्यावर कारवाई होईल...

महापालिकेचे अतिक्रमण पथक खोके काढत होते. त्यावेळी राजकीय पदाधिकाऱ्यांनी त्यात हस्तक्षेप केला. महापालिका आयुक्तांना मुख्यमंत्र्यांनी फोन केला आहे. तुम्ही कारवाई करू नका, अन्यथा तुमच्यावर कारवाई होईल, असा त्यांनी पथकातील अधिकाऱ्यांना दिला. त्यामुळे पथकातील अधिकारही अवाक झाल्याचे दिसून आले.

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात घुमणार नादब्रह्म

**वारकऱ्यांचा लढा यशस्वी**

**पंढरपूर :** श्री क्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये वारकऱ्यांना भजन कीर्तन करण्यास परवानगी नाकारण्यात आली होती. त्यावर वारकऱ्यांनी मंदिर समितीच्या या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला होता.

यावर आता मंदिर समितीला नमते घ्यावे लागले असून मंदिरातील सभा मंडपामध्ये वारकऱ्यांना भजन कीर्तन करण्यास परवानगी मिळाली आहे. या संदर्भातील माहिती ही मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांनी दिली आहे. आळंदी येथील विनोद जाधव महाराज यांना मंदिरातील विठ्ठल सभा मंडपामध्ये नामजप करण्यास मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांनी परवानगी नाकारली होती. त्यानंतर वारकरी आणि मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांमधील वाद निर्माण झाला होता. माध्यमांनी आवाज उठवल्यानंतर आज मंदिर समितीने आपल्या निर्णयाचा फेर विचार करत मंदिरातील सभा मंडपामध्ये वारकऱ्यांना नाम जप भजन कीर्तन करण्यास परवानगी दिली आहे. दरम्यान, या संदर्भात काल शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनीही मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांना तशा सूचना दिल्या होत्या.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पेट्रोल स्वस्त असताना माझ्याकडेही दुचाकी होती

| कल्याण |
| --- |
| 145-06-259 |

| मेन बाजार |
| --- |
| 118-04-338 |

## मंत्रालयातून फर्मान येताच सोलापुरातील अतिक्रमण हटाव मोहीम बारगळली

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या भिंतीलगत असलेली खोकी काढण्यासाठी महापालिकेचे पथक बुधवारी सकाळी पोहोचले होते. पथकाने खोक्यांसमोरील काही कट्टे उखडले. यादरम्यान मुख्यमंत्री कार्यालयातून मनपा आयुक्तांना फोन गेला आणि ताबडतोब कारवाई थांबली.

जिल्हा परिषद, काँग्रेस भवनासमोरील खोकी वाहतुकीला अडथळा ठरत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यानुसार पाहणी केल्यानंतर महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी या भागातील अनधिकृत दुकाने हटविण्याचे आदेश भूमी व मालमत्ता विभाग, अतिक्रमण विरोधी पथकाला दिले होते. त्यानुसार पालिकेचे अतिक्रमण हटाव पथक बुधवारी सकाळी काँग्रेस भवनासमोर दाखल झाले. सोबत जेसीबी, साहित्य जप्त करण्यासाठी वाहने होती. पथकातील अधिकाऱ्यांनी सर्व खोक्यांमधील साहित्य बाहेर काढा, सर्वच जप्त होणार असल्याचे सांगितले. त्यामुळे दुकानदारांची पळापळ सुरू झाले. पथकाने काही खोके काढले देखील. मात्र त्याच दरम्यान, खोकेधारक संघटनेचे अध्यक्ष गौतम मसलखांब आणि इतर लोक पथकाकडे पोहोचले. आमची दुकाने बेकायदेशीर नाहीत. आमच्या पुनर्वसनाचा विषय प्रलंबित आहे. एकतर्फी कारवाई करू नका, अशी विनंती केली. त्यांनी थेट आमदार विजयकुमार



देशमुख, शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांना फोन केले. त्यानंतर काळजे, बापू ढगे आणि इतर कार्यकर्ते दाखल झाले. मुख्यमंत्री कार्यालयातून मनपा आयुक्तांना फोन गेला आहे. तुम्ही कारवाई करू असे ढगे यांनी अतिक्रमण पथकाला आणि मनपा उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांना सांगितले. त्यानंतर ही कारवाई मनपाने थांबवली.

## ऑनलाइन ओळखीतून प्रेमात रूपांतर झालेल्या अल्पवयीन मुलाने दबावाखाली घेतली फाशी

**फाशी घेऊन मर म्हणणाऱ्या कोल्हापुरातील पाच जणांवर गुन्हा दाखल**

**सोलापूर :** तुला जर प्रेमप्रकरण संपवायचे असेल तर तू फाशी घेऊन मर नाहीतर आम्ही सोलापूरला येऊन तुला व तुझ्या आई वडिलांना मारून टाकतो, अशा धमक्या दिल्याने सोलापुरातील कर्णिक नगर येथे राहणाऱ्या एका १७ वर्षाच्या अल्पवयीन मुलाने सुसाईड नोट व फोनवर रेकॉर्ड करून आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.ही घटना १७ मे रोजी घडली होती.



याबाबत मयत मुलाच्या आईने एमआयडीसी पोलिसांत नुकतीच फिर्याद दिली असून त्यानुसार चांदवड येथील सहा जणांच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा झाला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी यांचा मयत मुलगा इयत्ता १० वी मध्ये शिकत होता. त्याची संशयित आरोपीशी एक वर्षापूर्वी ऑनलाईन ओळख झाली होती. त्याचे रूपांतर प्रेमात झाले. संशयित आरोपी ही रोज सकाळी व संध्याकाळी फिर्यादीच्या मुलास फोन करत असत व बोलत असे तसेच मयत याच्याकडून ऑनलाईन कपडे, खाण्याचे वस्तू, मोबाईल रिजार्च, ऑनलाईन पैसे मागवून घेत असे तसेच ती मुलाला सोलापूर येथे येऊन भेटून जात असत. हे प्रेमसंबंध आरोपीची आई व भावाला समजल्याने व इतर नातेवाईकांनी मयत मुलास फोन करून जीवे मारण्याची धमकी दिली तसेच सोलापूरला येऊन तुझे तुकडे तुकडे करतो नाहीतर तू स्वतः फाशी घेऊन मर म्हणून धमकी देत होते. फिर्यादीचा मुलगा अज्ञान असल्याने त्याने आईवडिलांच्या भीतीने हा प्रकार कोणास न सांगता एका डायरीत नोंद करून मोबाईलमध्ये आरोपींच्या धमकीच्या आवाजाचे रेकॉर्ड करून ठेवले होते.१७ सप्टेंबर रोजी रात्री दहा ते बारा वाजण्याच्या सुमारास संशयित आरोपींनी त्या मुलास तुला जर प्रेमप्रकरण संपवायचे असेल तर तू फाशी घेऊन मर नाहीतर आम्ही सोलापूरला येऊन तुला व तुझ्या आई-वडिलांना मारून टाकतो, अशी धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीचे मयत मुलाने सुसाईड नोट व फोन करून रेकॉर्ड करून टेबलावर ठेवून सुसाईड केले. त्यामुळे मुलाच्या मरण्यास जबाबदार धरून पीडित महिलेने वैष्णवी विठोबा नाईक, (वय-२३), वैशाली विठोबा नाईक, (वय-४५), विठोबा यल्लपा नाईक (वय-५०), पांडुरंग विठोबा नाईक, (वय-३०), विजया विठोबा नाईक, (वय-२२), (सर्व रा. हालकर्णी नाईक गल्ली दुर्गा देवी मंदिराजवळ हालकर्णी ता. चांदगड, जि.कोल्हापूर) यांच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक वळसंगे हे करीत आहेत.

CMYK